# जागतिक स्त्रीवाद आणि मराठी साहित्य




मुख्यसंपादक
प्राचार्य डॉ. वसंत बिरादार

संपादक
डॉ. अनिल मुंढे

सहसंपादक
डॉ. मारोती कसाब

**स्त्रीवाद व्याख्या:**

सिमोन`दि बोव्हूआर:स्त्रीवादम्हणजे केवळ स्त्री हक्काचे समर्थन नव्हे तर स्त्रीची 'स्त्री' अशी ओळख करून देणे, स्त्री प्रश्नाप्रती आस्था निर्माण करणे.३

**अश्विनी धोंगडे:**

स्त्रीवाद म्हणजे पुरुषापासून फारकत घेऊन स्वत:चा सवतासुभा निर्माण करणे नव्हे, पण संस्कृतीच्या हजार वर्षाच्या इतिहासाने आणि बाईचे माणूस पण नाकारुन तिला पशुतुल्य अवस्था प्राप्त करून दिली. त्यातून बाहेर पडून आपले हक्क प्रस्थापित करून घेण्यासाठी निर्माण केलेले हे व्यासपीठ आहे."४ स्त्रीवादी ही सामाजिक परिवर्तनवादी विचारसरणी आहे. फेमिनिझम या इंग्रजी शब्दाला मराठी भाषेत **स्त्रीवाद** ही संज्ञा वापरली जाते. **फेमिनिझम** हा लॅटिन शब्द भाषेतील शब्द आहे. फेमिना या शब्दाचा अर्थ **वूमन** असा होतो. इसवी सन १९९० च्या दशकात **वुमेनइसम** या ऐवजी **फेमिनिझम** हा शब्द सर्वप्रथम वापरला गेला.

साहित्यावर भौतिक, सांस्कृतिक, आध्यात्मिक, राजकीय, सामाजिक, आर्थिक स्थित्यंतराचा परिणाम होत असतो. त्यामुळे त्या काळातही साहित्याची भाषा लेखकाचे सामाजिक बांधिलकी, कौटुंबिक अनुभव अशा अनेक प्रश्नांचा मागोवा एक प्रकारे लेखक आपल्याला आलेल्या अनुभवातून, लेखनातून घेत असतो. सन २००० नंतर च्या स्त्रियांनी लिहिलेल्या या कादंबऱ्यांचा सामाजिक पर्यावरणातील बदलाचा परिणाम त्याच्यावर झालेला दिसून येतो. भारताने गॅट करारावर सही करून मुक्त अर्थव्यवस्था स्वीकारली. आणि जागतिकीकरणाचे वारे जोराने वाहू लागले. खाउजा संस्कृतीमुळे सामाजिक आणि सांस्कृतिक मूल्यांमध्ये मोठ्या प्रमाणात परिवर्तन झालेले दिसू लागले. त्याचाच परिणाम भारतीय समाजजीवनातील स्त्री जीवनावर झालेला दिसतो. शहरी स्त्रिया आणि ग्रामीण स्त्रिया यांची राहणीमान खाणे-पिणे पेहराव एकंदरीतच संस्कृतीबदललेली दिसते. चैनीच्या सुख-वस्तू, चंगळवादीवृत्ती अशा प्रकारचे जीवन असावे. याचं मूल्य समाजामध्ये स्थिर झालं. नवऱ्याला जास्तीत जास्त पगार असावा व सुंदर, गोरी शिकलेली मुलगी बायको म्हणून मिळावी असे विचार पुरुष करू लागले. समाजात भौतिक सुखसोयी येऊ लागल्या. व्यसनाधीनता समाजामध्ये वाढीस लागली. नोकरी करणाऱ्या स्त्रियाची दमछाक होऊ लागली. कामाच्या ठिकाणी नवऱ्याव्यतिरिक्त अन्य पुरुषांच्या संपर्कात येणे. स्त्री-स्वातंत्र्य, मोबाईलचे

वाढते प्रमाण यामुळे कुटुंबांमध्ये गैरसमज वाढू लागले. घरगुती भांडण-वाद वाढू लागले. या कारणांमुळे घटस्फोटांचे प्रमाण वाढले. स्त्रिया आर्थिक दृष्ट्या सबळ आणि सक्षम झाल्यानंतर त्या विभक्त राहू लागल्या. कुटुंबे विस्कळीत होऊ लागली. यामुळे कुटुंबांमध्ये अनेक आर्थिक प्रश्न निर्माण झाले. पती-पत्नीच्या घटस्फोटानंतर मुलांच्या सुरक्षतेचा प्रश्न निर्माण होऊ लागला. मनुष्य जीवनावर, राजकीय, सामाजिक आर्थिक स्थित्यंतराचा परिणाम होत असतो. त्या काळातही साहित्याची भाषा लेखकाची सामाजिक बांधिलकी सामाजिक कौटुंबिक अनेक प्रश्नांचा मागोवा घेत असते. एक प्रकारे लेखक आपल्याला आलेल्या अनुभवातून लेखनातून मांडणी करत असतो. सन २००० नंतर च्या स्त्रियांनी लिहिलेल्या या कादंबऱ्यांचा सामाजिक पर्यावरणातील बदलाचा परिणाम त्याच्यावर झालेला दिसून येतो. सामाजिक कौटुंबिक प्रश्नारोबरच लैंगिक प्रश्न ही निर्माण झाली, इ.अनेक गोष्टींचे चित्रण २००० नंतरच्या स्त्री कादंबरी लेखिकांच्या लेखनामध्ये दिसून येऊ लागले. २००० नंतरच्या कालखंडातील स्त्रीवादी कादंबऱ्यांचा विचार करत असताना काही निवडक कादंबऱ्यांचा विचार या शोधनिबंधात केलेला आहे. भारतीय संस्कृती ही पुरुषप्रधान संस्कृती आहे कुटुंब पद्धती ही पितृसत्ताक असल्यामुळे स्त्री चा होणारा मानसिक होऊन आणि भावनिक कोंडमारा शोषण लग्नसंस्था या एकमेव घटकांमुळे निर्माण झालेल्या कौटुंबिक आणि सामाजिक या घटकामुळे शोषण आणि लग्नसंस्था या एकमेव घटकामुळे स्त्रियांचे कौटुंबिक व सामाजिक स्थान आणि तिचे अस्तित्व हे विषय प्रामुख्याने लेखिकांनी आपल्या साहित्यात मांडलेले दिसून येतात. २००० नंतरच्या स्त्री कादंबरी विषय विविधांगी असून मध्यमवर्गीय चौकटीतले आहेत. सन २००० मध्ये आशा बगे यांची प्रकाशित झालेली सेतू ही कादंबरी त्यानंतर 'भूमी' (२००४) **भूमिका आणि उत्सव** '२०११' **मुद्रा** आणि **चरित्रात्मक चक्रवती** या कादंबऱ्यांतून आशा बगे यांनी मानवी जीवनाचे सखोल चिंतन करून त्यामध्ये माणसांच्या मनाचा तळ शोधण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. यांच्या भूमी या कादंबरीत मैत्री ही नाही का नाईका असून ती आधुनिक आत्मनिर्भर पण गोंधळलेल्या महिलांचं प्रतिनिधित्व करणारी आहे. आजच्या काळातील एक महत्त्वाची आणि सशक्त कादंबरी म्हणून याकडे पाहता येईल. मेघना पेठे यांची **नातिचरामि** ही कादंबरी २००५ मध्ये प्रकाशित झाली या कादंबरीमध्ये महानगरातील सुशिक्षित व आर्थिक दृष्ट्या सक्षम असणाऱ्या स्त्रियांच्या आयुष्यात पुरुषप्रधान संस्कृतीच्या

दुराग्रही भूमिकेतून त्यांना आलेल्या समस्या आणि स्त्रियांनी जगण्याचे शोधलेले पर्याय स्त्रियांच्या जगण्याला उभारी देतात की नाही याचा शोध या कादंबरी मधून मुख्य नायिका मीराच्या निमित्ताने घेतलेला आहे. मीरा आहे बंडखोर स्त्री पात्र कादंबरीत म्हणते," मला पैशाचं आकर्षण अजिबात नाही. मला पुस्तकी शिक्षणातल्या पदव्यांचे फार कौतुक नाही. मला पोशिंदा नको आहे. संरक्षक पोलीसही नको आहे. मला नेकीने आणि उत्साहाने जगणारा आणि जगू देणारा निरोगी प्रामाणिक, सहचर, सोबती हवा आहे. मला त्याच्याबरोबर वैध सेक्स हवा आहे. आजूबाजूला असं कोण आहे? माझ्या चार वीत भवतालात नजीकच्या भविष्यकाळात असं कोण मला भेटणार आहे"५ श्रुती आवटे यांची **लॉगआऊट** (२०१४) ही कादंबरी बदलती मूल्य व्यवस्था समाजजीवन मोबाइल इंटरनेट इंटरनेट सारखे इलेक्ट्रॉनिक माध्यमे या सगळयांचा आजच्या कोवळया बाल पिढीवर नेमक्या काय परिणाम होतो याचे वास्तव चित्रण यांनी केले आहे. या कादंबरीमध्ये जानवी ही मुख्य नायिका असून तिच्या पौगंडावस्थातेतील मुलीच्या स्वप्राळू मनाचे चित्रण वर्णन केले आहे. तारा वनारसे यांची **शामिनी** ही कादंबरी शूर्पणखेचे च्या जीवनाची कहाणी व्यक्त केली असून जानकीच्या हळव्या मनाचे चित्रण या कादंबरीमध्ये आले आहे गुरु पूर्ण करणे नखे ने रामावर प्रेम करण्याचे मोठे धाडस केल्याने तिला मोठी शिक्षा भोगावी लागली या कादंबरीमध्ये मिथक रुपात लेखन केलेले आहे. या कादंबरीमध्ये आजच्या आर्थिक दृष्ट्या सक्षम असणाऱ्या महिलांच्या जीवनातील कौटुंबिक प्रश्नांचा आढावा या कादंबरीमध्ये येतो कुठे आहे सर सर कुठे आहे.ज्योती पुजारी यांची **शेवटचा आरंभ** (२०००) ही कादंबरी बलात्कारासारख्या जिवंत ज्वलंत समस्या अत्यंत संवेदनशीलतेने आणि अनेक बाजूंनी वेध घेणारी बलात्कार पीडितांच्या समस्येकडे समाजाचे लक्ष देत नाही स्वाभिमानासाठी त्यांना लढण्याची वर देणार नव्या युगाची सुरुवात करणारी स्त्रीवादी विचारांनी प्रभावित झालेली ही कादंबरी वेग ठरते. शांता गोखले यांची **रिटावेलिणकर** (२००८) या कादंबरीमध्ये पुरुष सत्तेला विरोध करून स्त्री म्हणून स्वतःचे अस्तित्व निर्माण करणारी नायिका ही मराठी कादंबरीत स्त्रीवादी साहित्याच्या पडलेल्या प्रभावातून लिहिली गेली.प्रतिमा इंगोले **पार्टटाईम** (२००२) या कादंबरीमध्ये स्त्रियांच्या वाटेला स्त्रियांचा होणारा मानसिक व शारीरिक शिक्षण तसेच स्त्रियांकडे समाजाची पाहण्याची विकृत दृष्टी लेखिकेने या कादंबरीमध्ये मांडलेली आहे अरुणा सबाने यांचे **विमुक्त** आणि **मुन्नी** २०१० या कादंबऱ्या

विचार करायला प्रवृत्त करतात. स्त्रीच्या वाट्याला आलेल्या संकटावर मात करून आपले जीवन आनंदाने कसे जगावे हे विमुक्ता कादंबरी शिकवते. स्त्री ही स्वबळावर, स्वकर्तुत्वावर आपले स्वतंत्र जीवन जगू शकते. हे अरुणा सबाने यांनी विमुक्ता या कादंबरी मधील वसू ही नायिका आणि मुन्नी या कादंबरी मधील वैदही या नायिका द्वारे दाखवून दिली आहे.

**निष्कर्ष**

१) स्त्रीवादी चळवळ ही मानवतावादी चळवळ आहे

२) १९७५पासून महाराष्ट्रात स्त्रीवादी चळवळीचा प्रभाव वाढला.

३) यावेळी स्त्री पुरुषासारखे स्वतंत्र जीवन जगू शकेलव तिला ज्यावेळी माणूस म्हणून समाजात स्थान मिळेल त्यावेळी स्त्रीवादाची गरज भासणार .नाही.

४) स्त्रीचे माणूस म्हणून असणारे मूल्य पुरुषांच्या बरोबरीने असल्याची जाणीव होते.

५) स्त्रीला स्वतंत्र वृत्तीने राहण्याची -वागण्याची धमक व त्यातून आलेला नात्यातील मोकळेपणा उल्लेखनीय वाटतो.

**समारोप:**

जागतिकीकरण व स्त्रीवादी साहित्य या संकल्पनेचा विचार करीत असताना जागतिकीकरणाचा स्त्री जीवनावर परिणाम झालेला दिसून येतो. या काळात समाजाची स्त्रीकडे पाहण्याची दृष्टी बदलली. स्त्रीच्या शिक्षणामुळे तिला आत्मभान आले. ती जागृत झाली. पुरुषांच्या बरोबरीने प्रत्येक कामात तिचा महत्त्वाचा वाटा आहे. स्त्रीने परंपरेने चालत आलेल्या रूढी प्रथा परंपरा मोडून काढल्या व नवीन विचारसरणी जोपासली. या जागतिकीकरणाच्या काळात स्त्रीला स्त्री म्हणून समाजातलं अस्तित्व टिकवून ठेवायचे आहे. तिला स्वतःचा आत्मसन्मान राखून, माणूस म्हणून जगायचे आहे.पण अजूनही स्त्रियांचे आर्थिक मानसिक आणि लैंगिक शोषण होऊन परत तिला लिंगाधष्टीत समाजव्यवस्थेला तोंड द्यावे लागत आहे. स्त्रीवादी कांदवरीमधील नायिका या प्रस्थापित समाजव्यवस्थेला उघडून टाकण्याचा प्रयत्न करताना दिसतात. यात कोणतीच तिळमात्र शंका नाही.

**संदर्भ**

१) विद्या व्यवहारे: 'साहित्य विमर्श'चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती २००३ पृ. ५५

२) ग्रामीण, दलित, स्त्रीवादी साहित्ययशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ' नाशिक, पु २०१६ पृ. १११-११२

३) Sign,sushila Feminism theory, criticism, Analysis,pencraft international Deli,First ed १९९७ ,page २१

४) धोंगडे अश्विनी स्त्रीवादी समीक्षा स्वरूप आणि उपयोजन दिलीपराज प्रकाशन प्रा लि पुणे द्वितीय आवृत्ती २००१ पृष्ठ ६

५) मेघना पेठे:' नातिचरामि' राजहंस प्रकाशन, प्रथमावृत्ती, जानेवारी २००५. पुष्ट ३३

***